# ८७ वे
# अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

कणकवली

दि. २६, २७, २८ व २९ एप्रिल २००७

अध्यक्षीय भाषण : श्रीमती लालन सारंग



अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, मुंबई.

८७ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या ह्या सोहळ्याच्या निमित्ताने सर्व नाट्यप्रेमी रसिकांना माझा नमस्कार. कमलाकर सारंग यांची आठवण आल्याशिवाय एकही दिवस जात नाही. अशात या अध्यक्षपदामुळे त्यांची आठवण झाली नाही असा क्षणही जात नाही.

सारंगांच्या सहवासाने मी नाट्यक्षेत्रात आले, वाढले, स्थिरावले. नाहीतर ही लालन पैंगणकर आज दुसरीच कोणीतरी असती. नाटकात आले हा एक नियतीचा खेळ होता. या खेळात सारंग भिडू मिळाला. साहित्य संघ, अत्रे थिएटर, रंगधारा, वेलकम थिएटर्स मधून व्यावसायिक रंगमंचावर अनेक नाटकं केली आणि अचानक १९७२ साली 'सखाराम बाईण्डर' मधली चंपा साकारायला मिळाली. हे नाटक इतकं वादळ निर्माण करील याची दोघांनाही जाणीव नव्हती. मग अंगावर चालून आलेला सगळा लढा आम्ही दोघं जिद्दीने लढलो. मानसिक, आर्थिक त्रास भोगला. त्यात सारंगने त्याची नोकरी गमावली व त्यातूनच आम्ही अभिषेक, कलारंग, संस्था स्थापन केल्या व १९९४ पर्यत विविध नाटके सादर केली. 'सखाराम बाईण्डर', 'रथचक्र', 'सूर्यास्त', 'कमला', 'जोडीदार', 'आरोप', 'खोलखोल पाणी', 'लग्न', 'पारध', 'जंगली कबूतर', 'बेबी', 'घरटे अपुले छान', 'धंदेवाईक', पोलीसनामा अशी अनेक. याच काळात गुजराथी रंगमंचावर देखील ६-७ नाटकातून काम केली. त्यांचे १५०० वर प्रयोग झाले. हिन्दी रंगमंच तर व्यावसायिक रंगमंचावर येण्यापूर्वीच केला होता. त्यातल 'स्टील फ्रेम' हे सत्यदेव दुबे दिग्दर्शित नाटक १९७१ साली

'सखाराम बाईण्डर' पूर्वी केलं. मराठी सिनेमा, मराठी, हिन्दी मालिका सुध्दा केल्या.

मराठी व्यावसायिक रंगमंचावर निर्मिती केलेली अनेक नाटक प्रायोगिक रंगमंचावर करण्याजोगी पण सारंगने ती जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचावीत म्हणून पदरमोड करून व्यावसायिक रंगमंचावर सादर केली. पैशाचा हिशेब केला नाही. आता मागे वळून बघताना मी खूप समाधानात आहे. पैशापेक्षा मोठ समाधान कलाकार म्हणून मिळालं आणि आम्ही दोघही धन्य झालो.

या सगळ्याच फलित म्हणून हा सन्मान मला मिळाला असं मी समजते. खरंतर तो माझ्यापेक्षा सारंगचा आहे. त्यामुळे मी हा सन्मान त्याच्या चरणी अर्पण करते.

हा सन्मान, हे पद वर्षभराच आहे त्यात आता एप्रिलमध्ये नाट्यसंमेलन म्हणजे त्यातले चार महिने गेले. पुन्हा नोव्हेंबरमध्ये नवीन अध्यक्षपदासाठी नावे येतील व डिसेंबरमध्ये नियोजित अध्यक्ष २००८ सालासाठी नियुक्त होईल ह्या सगळ्याच भान मला आहे. त्यामुळे मी अमूक करीन तमूक करीन या वल्गनां माझ्या रोखठोक स्वभावामुळे करणार नाही. मला जे मनापासून वाटत, जाणवतं ते मी व्यक्त करणार आहे. सगळ्यांची साथ मिळाली तर नाट्यसृष्टीसाठी प्रयत्न करता येतील, हे एका माणसाचे काम नाही. एकजूट नसलेल्या नाट्य व्यवसायात हे शक्य होणार आहे का?

ज्या रंगभूमीशी माझा संबंध आला, जी जवळून पाहिली, ज्यावर वावरलेही त्याबद्दल आता थोडंसं बोलते. सरळसाधं, कदाचित भाबड

आशावादी, पण अत्यंत कळकळीने आणि बिलकूल मनापासून.

रंगभूमीचा विचार करताना तो बालरंगभूमीपासूनच सुरू होतो. बालरंगभूमी ही रंगभूमीच्या विकासाची पहिली पायरी आहे. आजही बालरंगभूमी म्हणजे मुलांच्या सुट्टीमध्ये त्यांना ठराविक पध्दतीने चालत आलेली नाटके दाखवणे व त्यात त्यांचे मनोरंजन झालं यावर स्वत:च समाधान करून घेणं अशीच धारणा आहे. आजच्या इलेक्ट्रॉनिक्सच्या जगात मुल बाहेरच्या जगात इतकी वावरत असतात, त्यांचं सामान्य ज्ञान इतकं अफाट असत. त्यात बहुतेक मध्यमवर्गीय मुल इंग्लीश माध्यमात शिकत असतात. आईवडिलसुध्दा मातृभाषेपेक्षा इंग्लीश शिकण्यावर जास्त भर देतात. अशा काळात त्यांना मराठी नाटकांकडे वळवण्यासाठी, नाटकांची आवड निर्माण होण्यासाठी कोणती नाटके सादर केली गेली पाहिजेत याचा मुळापासून विचार करावयाची वेळ आली आहे. ॲनिमेशन मधून दाखवलेला हनुमान, श्रीकृष्ण मुल आवडीन बघतात, स्पायडरमॅनही.

या सगळ्या परिस्थितीत पूर्ण वर्षभर सातत्याने बालनाट्याचा आविष्कार झाला पाहिजे. यासाठी लागणारा पैसा नाटकाच्या सादरीकरणातून मिळणार नाही. पण त्यांना बालरंगभूमीवर बागडता यावं, त्यांच्या मनाप्रमाणे काम करता येईल याकरता, काय करता येईल याचा विचार होणं आवश्यक आहे.

आज महाराष्ट्रात मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी पूर्णवेळ नाटकाचे अभ्यासक्रम आहेत.एक विषय म्हणून नाटक अनेक ठिकाणी महाविद्यालयांमधून शिकवल जात. मग शालेय

अभ्यासक्रमात नाटक हा विषय का नको? संगीत, चित्रकला, कधी नृत्यही असत. नाटकही असावं असं फार वाटतं. काही शाळा ह्या दिशेने प्रयत्न करताहेत ही स्वागतार्ह गोष्ट आहे.

मुलांसाठी सशक्त नाटकं लिहिणारे नाटककार, बालनाटय सादर करण्यासाठी प्रत्येक मोठ्या नाटयगृहाबरोबर छोटी नाट्यगृहे, तालमीसाठी जागा अतिशय अल्प मोबदल्यात उपलब्ध करून दिली गेली पाहिजे. एका अर्थाने बालोद्यान सारखेच त्याना नाटयोद्यान उपलब्ध करून दिलं तर वर्षभर अभ्यासाव्यतिरिक्त मुल त्यात रमू शकतील. नाटक करण्याचा व पाहण्याचा आनंद लुटू शकतील व त्यातूनच नाटकासाठी पुढील पिढी तयार होईल. शासनाने याकडे लक्ष द्यावे व अनुदानाचा उपयोग या प्रकारे अशा कामासाठी करावा.

हीच गोष्ट प्रायोगिक नाटकासंबंधातही म्हणता येईल. आज याही परिस्थितीत प्रायोगिक चळवळ उत्तमरीत्या चालू आहे. त्यातली 'गमभन', 'माकडाच्या हाती शॅम्पेन', 'फायनल ड्राफ्ट' वगैरे नाटक रंगभूमीवर आली आहेत. त्याना प्रेक्षकांचाही प्रतिसाद मिळत आहे. व्यावसायिक निर्माते ही नाटक व्यावसायिक रंगमंचावर आणत आहेत. वर उल्लेख केल्याप्रमाणे सर्व महाराष्ट्रात लहान नाटयगृहे व तालमीचे हॉल उपलब्ध करून दिल्यास प्रायोगिकवाल्यांचाही मोठा प्रश्न सुटेल. मलातर वाटतं की अशी चांगली नाटके नाटककारांनी लिहिली तर ती प्रायोगिक नाटक करणाऱ्यांना, जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत नेण्यासाठी एकाद्याच संस्थेची मक्तेदारी अनुदानासाठी न ठेवता त्या त्या नाटकांच्या निर्मितीसाठी दिली जावी.

एन्.एफ्.डी.सी. सारखी व्यवस्था नाट्यकलेसाठी असावी व अशी नाटके निवडून त्याला अर्थपुरवठा शासनाकडून केला जावा. यामुळे प्रायोगिक रंगभूमी अजूनही कार्य जोमाने करू शकेल. एखाद्या दुसऱ्या संस्थेला अनुदान देऊन इतर रंगकर्मींना आपले प्रयोग सादर करताना अडचणी येतच रहातात. आपण चांगले नाटक केलं तर आपल्यालाही मदत मिळू शकेल या भावनेनं ते जास्त उत्साहाने काम करू शकतील.

आता संगीत रंगभूमीकडे वळूया. आजवर संगीत रंगभूमी वर्षानुवर्ष त्याच धर्तीवर चाललेली आहे. ती विकसित व्हावी म्हणून वेगळा विचार करण्याची कोणालाही गरज वाटत नाही. संगीत नाटके हा आपल्या नाट्य परंपरेचा एक अविभाज्य भाग आहे याबद्दल कुणाचही दुमत होण्याचा प्रश्नच नाही. पण तो तसाच चालविण्याचा हट्ट कशाला? आताच्या पिढीला त्या प्रकारची नाटके भावणार आहेत का? याचा विचार फार गंभीरतेने करावा लागेल. आज ही नाटके कोण बघत? असं म्हटल्यास फक्त सिनियर सिटीझन्स हेच उत्तर येईल. त्या नंतरच्या पिढीच काय? याचा विचार होणार आहे का?

मला तर स्पष्टपणे मांडावसं वाटतं की आपल्या या कलेची परंपरा जपली पाहिजे. त्यासाठी शासनातर्फे दरवर्षी महाराष्ट्रातल्या विविध ठिकाणी एक संगीत नाट्यमहोत्सव भरवला जावा. त्यासाठी संगीत रंगभूमीवरील निष्ठावंत संस्थेकडे याचा भार सोपवून एक अत्यंत दर्जेदार महोत्सव घडवून आणावा ज्यामुळे ज्या प्रेक्षकांना पिढीजात संगीत नाटके पहावयाची असतील त्यांचे समाधान होईल. हा एक भाग झाला. आणि नंतर मग संगीत रंगभूमीवर

नवीन विषय, नवीन मांडणी केलेल्या नाटकांत सहज एकरूप होईल असे नाट्यसंगीत ठेवून नाटकाची निर्मिती व्हावी. अनेक तरूण मुलमुली नाटयसंगीत अजूनही जोपासताना आपण पाहातो. अशांना आग्रहाने रंगभूमीवर आणून आताच्या काळात शोभतील, रूचतील, तरूण पिढीला आकर्षित करतील अशा नवीन नाटकांची निर्मिती झाली तरच संगीत रंगभूमी तगेल, जगेल. जुनं ते सोनं ही धारणा आता बदलण्याची वेळ आली आहे. आता पडद्यांचे नेपथ्य, वयांमुळे न शोभणारे कलावंत व माईकसमोर उभं राहून पल्लेदार तान मारत गाणारे कलावंत व ज्याला उद्देशून गाणं म्हटलं जात त्याची केविलवाणी निरर्थक हालचाल हे सगळं बदलण्याची वेळ आलेली आहे. एखाद्याच संस्थेला अनुदान देऊन शासनाने आपले कर्तव्य बजावले यावर समाधान मानू नये. ती संस्था नवीन असेल किंवा जुनी, तिला या कामासाठी मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे.

आता व्यावसायिक रंगमंच व्यवसायाला मरगळ आली आहे. प्रेक्षक नाटक बघायला थिएटरकडे वळत नाहीत. काय करावं हा मोठा यक्षप्रश्न नाटकाशी संबधीत सगळ्यांसमोर उभा राहिला आहे आणि याबद्दल दुमत होण्याचा प्रश्नच नाही. सर्व व्यावसायिकांनी एकत्र बसून यावर गंभीरपणे विचार केला पाहिजे. काय कमी पडतय? कोण दोषी आहे? चॅनेल्स्वर मालिकेने घातलेला धुमाकूळ हे तर याचं कारण नसाव? की चांगली नाटक व्यवसायासाठी अभावाने लिहिली जाताहेत? रंगभूमीसाठी वाहून घेणारे नाटककार, कलावंत आता मराठी सिनेमा, चॅनेल्सच्या मालिकेत गुंतले आहेत. झटपट मिळणारा पैसा, प्रसिध्दि कोणाला नको असते? पूर्वी हे मोह

नव्हते.

कलाकार फक्त रंगमंचाला वाहून घेत होता. नाटककार चांगली नाटके लिहीत होते व ती रंगमंचावर सादर करणाऱ्या अनेक ख्यातनाम संस्था होत्या. पण हे दृश्य पालटल आहे.

समांतर रंगभूमीवर आलेली नाटके पहाता, ती प्रेक्षकांच्या पसंतीला उतरलेलीही पाहता, अगदीच निराश होण्यासारखी परिस्थिती नाही. फक्त सातत्याने चांगली सशक्त नाटके लिहिण्याची, सादर करण्याची, थोडा मोह बाजूला ठेवून कलाकारांनी वेळ देण्याची गरज आहे. प्रेक्षक येतील, जरुर येतील थोडा काळ झगडावं लागेल हे निश्चित.

व्यावसायिकांना सरसकट अनुदान देऊन हा प्रश्न सुटेल असं मला अजिबात वाटत नाही. त्याने प्रेक्षक थिएटरकडे वळतील का? अनुदानाने चांगली नाटके प्रेक्षकांना कमी तिकीटात दाखवली जाणार आहेत का? अनुदान दिल की शासनाला वाटतं आपण आपल्या कर्तव्यातून मोकळे झालो. त्यापेक्षा एखादी नवीन संस्था असेल व सशक्त नाट्यसंहिता, चांगला दिग्दर्शक, कलावंतासकट नाटक सादर करणार असेल तर स्वतंत्रपणे या गोष्टींचा विचार होऊन अशा नाटकांचे प्रयोग जास्तीत जास्त व्हावेत यासाठी विशिष्ट नाटकांसाठी अर्ज मागवून त्यातून निवड करुन होणाऱ्या प्रयोगासाठी संहितेबरोबर रुपरेषा मागवून त्या त्या नाटकापुरते अनुदान दिले जावे. संगीत नाटक अकादमी, एन.एफ.डी.सी. वगैरे संस्था असंच सरसकटीकरण टाकून केवळ ज्येष्ठता तेवढी न पाहता, वैयक्तिक आणि विशिष्ट प्रपोजल्सचा विचार करतात.

आता सिनेमासाठी मल्टीप्लेक्स थिएटर्स तयार झाली आहेत. त्याच धर्तीवर जर प्रत्येक जिल्ह्यात एक ५०० प्रेक्षकांच, एक २५० प्रेक्षकांसाठी व एक १०० प्रेक्षक बसतील असे रंगमंच, त्याबरोबर तालमींसाठी जागा, गोव्याच्या कलाअकादमीच्या धर्तीवर उभी केली गेली तर एकाच प्रांगणात सर्वजण वावरतील. प्रत्येकाला आपआपल्याच पध्दतीने,आवडीने प्रयोग करून पहाता येईल व नाटकाचा एक माहोल निर्माण होईल अस निदान स्वप्न पाहायला काय हरकत आहे ?

ह्या व्यतिरिक्त इतर प्रकारचीही रंगभूमी आहे. विधीनाट्य, लोकनाट्य आहे, त्या कलाकारांचे आर्थिक आणि इतर प्रश्न आहेत. कोकणातल्या दशावतार आणि देशावरचे तमाशे हीच उदाहरणं पहाना. मला त्याचा थेट अनुभव एक कलावंत म्हणून नाही. पण जाणकारांनी ह्याचाही विचार केला पाहिजे.

*– लालन सारंग*